# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः11.09.2025** **वारःगुरुवार**

---

- परदेशातील उद्योगांना अनुसरून औद्योगिक प्रशिक्षणात अभ्यासक्रमांचा समावेश

- नेपाळमध्ये अडकलेल्या पर्यटकांना परत आणण्यासाठी राज्य सरकारचे प्रयत्न

- सातारा साहित्य संमेलनासाठी मराठी भाषा विभागाकडून अतिरिक्त एक कोटी रुपये, मराठी भाषा समृद्धीसाठी अनुवाद समिती, अमराठी भाषकांसाठी मराठी भाषा ॲप आणि

-आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत भारताचा संयुक्त अरब अमिरातीवर नऊ गडी राखून विजय.

**<u>मनुष्यबळ</u>**

परदेशातील उद्योगांना आवश्यक कुशल मनुष्यबळाची गरज लक्षात घेवून त्यानुसार अभ्यासक्रमांचा प्रशिक्षणात समावेश करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिले. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या आढावा बैठकीत ते मुंबईत बोलत होते. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाबरोबरच खासगी संस्थासाठीही सक्षम यंत्रणा तयार करणं, आयटीआयमार्फत अल्पकालीन अभ्यासक्रम राबवणं, यासह प्रशासनामार्फत केलेल्या सर्व सामंजस्य करारांचा आढावा सीएम डॅशबोर्डवर घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले. कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना तसंच उपक्रमांची माहिती यावेळी दिली.

**<u>आरटीएल</u>**

केंद्रीय ऊर्जा संशोधन प्रयोगशाळेच्या नाशिक इथल्या प्रादेशिक तपासणी प्रयोगशाळेमुळं विद्युत उपकरण उत्पादन करणाऱ्या उद्योगांसाठी आवश्यक व्यवस्था राज्यातच तयार होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल व्यक्त केला. शिलापूर इथं या प्रयोगशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहरलाल

खट्टर यावेळी प्रामुख्यानं उपस्थित होते. विद्युत उपकरण तपासणीवर खर्च अधिक होत असल्यानं या क्षेत्रातील गुंतवणुकीवर मर्यादा येत होत्या. नाशिक आरटीएलमुळं ट्रान्सफॉर्मरपासून विद्युत उपकरणांपर्यंत विविध उत्पादनांसाठी आवश्यक व्यवस्था आणि इलेक्ट्रॉनिक वाहनांच्या उत्पादनाला लाभ होईल अशी अपेक्षा आहे.

**<u>महानेपाळ</u>**

नेपाळमधील राजकीय अस्थिरता आणि त्यामुळे निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर तिथं अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना सुखरुप परत आणण्यासाठी राज्य सरकार युध्द पातळीवर प्रयत्न करत असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्रालय तसंच महाराष्ट्र सदन यांच्या माध्यमातून राज्य शासन नेपाळमधील भारतीय दूतावासाच्या संपर्कात असून राज्यातील पर्यटकांना आवश्यक ती मदत पुरविण्याचे प्रयत्न करत आहे. ठाणे, पुणे, मुंबई, लातूर, कोल्हापूर जिल्ह्यातील सुमारे १०० पर्यटक नेपाळमध्ये अडकले असल्याची माहिती आतापर्यंत प्राप्त झाली आहे.  यामध्ये ठाण्यातील सर्वाधिक, तर नाशिकमधले ४ नागरिक आहेत.

**<u>मराठी</u>**

सातारा इथं होणाऱ्या ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी मराठी भाषा विभागामार्फत अतिरिक्त एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाणार असल्याचं मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाद्वारे काल पुण्यात आयोजित कार्यक्रमात जाहीर केलं. संमेलनाच्या बोधचिन्हाचं अनावरण ज्येष्ठ हास्यचित्रकार शि. द. फडणीस यांच्या हस्ते करण्यात आलं. साताऱ्याच ऐतिहासिक महत्त्व या बोधचिन्हातून प्रकट करण्यात आलं आहे. उत्तमोत्तम साहित्याचे मराठीत अनुवाद व्हावेत यासाठी अनुवाद समिती स्थापन करण्यात आली असल्याचंही सामंत म्हणाले. राज्यातील अमराठी व्यक्तींना मराठी शिकण्यासाठी लवकरच ॲप विकसित केलं जाणार असल्याचंही त्यांनी जाहीर केलं.

**<u>'नोपीयूसीनोफ्युएल'</u>**

प्रत्येक वाहनाला दिलं जाणारं प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र वैध असणं गरजेचं आहे असं परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी काल एका बैठकीत सांगितलं. अवैध प्रमाणपत्र निर्मितीची साखळी पूर्णतः बंद करण्यासाठी भविष्यात प्रत्येक पेट्रोल पंपावर 'विना प्रमाणपत्र इंधन नाही' या उपक्रमाची सक्तीनं अंमलबजावणी करण्याचे निर्देश सरनाईक यांनी दिले.

**लोकलेखा**

महाराष्ट्र विधानमंडळ लोक लेखा समितीची बैठक आमदार विजय वडेट्टीवार यांच्या अध्यक्षतेखाली पुणे विभागीय आयुक्त कार्यालयात काल झाली. भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या सन २०१८-१९ या वर्षाकरिता आर्थिक आणि महसूल क्षेत्र अहवालातील अनर्जित उत्पन्नाच्या महसूल वसूलीबाबत परिच्छेदाच्या अनुषंगानं संबंधित अधिकाऱ्यांकडून वस्तुस्थितीची माहिती घेऊन म्हणणं नोंदविण्यात आलं.

हे प्रादेशिक बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून देण्यात येत आहे.

**इंट्रो-जीएसटी**

केंद्र सरकारनं वस्तू आणि सेवा कराची नवीन रचना लागू केली आहे. ही कररचना सर्वसामान्य नागरिकांना, विशेषतः शेतकऱ्यांना दिलासा देणारी असल्याची प्रतिक्रिया धाराशिव जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत जाधव यांनी आकाशवाणीशी बोलताना व्यक्त केली...

**सिंचन**

कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या योजना क्रमांक दोनमधील टप्पा क्रमांक १ ते ५ चं काम पूर्ण होत आले असून रामदारा ते एकुरका या टप्पा क्रमांक ६ च्या कामालाही शासनानं मंजुरी दिली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. त्यामुळं तुळजापूर, उमरगा आणि लोहारा या तीन तालुक्यात पाणी वितरणाची व्यवस्था निर्माण झाल्यावर सुमारे ७ हजाराहून अधिक हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे.

**करार**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांना सामान्य सेवा केंद्रामार्फत महामंडळाच्या योजनांचा लाभ माफक दरात देण्याबाबत व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख आणि सीएससीचे प्रमुख वैभव देशपांडे यांच्या उपस्थितीत काल मुंबईत एक सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार लाभार्थ्यांना त्यांच्या नजीकच्या सीएससी केंद्रावर महामंडळाच्या सुविधांचा लाभ घेता येणार आहे. त्यामुळं लाभार्थ्यांचा वेळ आणि खर्चामध्ये बचत होणार आहे.

**कार्यशाळा**

**<u>मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान अंतर्गत</u>**

अकोला जिल्ह्यातील, अकोट इथं मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानाबाबत तालुकास्तरीय कार्यशाळा काल घेण्यात आली. अकोट तालुक्यातील उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, अधिकारी-कर्मचारी, अंगणवाडी आणि आशा सेविका, ग्राम रोजगार सेवक यावेळी उपस्थित होते. या अभियानाच्या अंतर्गत मिळणारी बक्षीसं, अभियान का आणि कशासाठी राबवायचे याबाबत सहाय्यक गट विकास अधिकारी राजेश खुमकर यांनी मार्गदर्शन केलं.

**<u>स्वच्छ</u>**

अमरावती महानगरपालिकेनं स्वच्छ वायू सर्वेक्षण 2025 मध्ये देशातील 3 ते 10 लाख लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये प्रथम स्थान पटकावल्याबद्दल नुकताच नवी दिल्ली इथं या शहराला 75 लाख रुपये रोख आणि करंडक देऊन गौरविण्यात आलं. राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमाच्या अंतर्गत घेण्यात आलेल्या या सर्वेक्षणात अमरावतीनं 200 पैकी 200 गुण मिळवले. जिल्ह्यात 340 किलोमीटर लांबीच्या रस्त्यांसह पदपथांची निर्मिती, 53 उद्यानांचं हरितीकरण आणि 19 एकर ओसाड जमिनीचं घनदाट जंगलात रूपांतर करण्यात आलं आहे.

**<u>प्रारुप</u>**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगानं प्रारूप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती आणि सूचनांपैकी १८९ हरकती आणि सूचनांवर काल मुंबईत यशवंतराव चव्हाण केंद्रात सुनावणी घेण्यात आली. सूचना पत्रानुसार नागरिकांना उद्या आज आणि उद्या या केंद्रात सुनावणीसाठी प्रत्यक्ष उपस्थित राहता येणार आहे.

**<u>पाणी</u>**

बीड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या ईट इथल्या जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या विद्युत फिडरला जवळा इथल्या उपकेंद्रातून विद्युत प्रवाह वाहीनीच्या नवीन जोडणीच्या कामाचा आरंभ बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते काल करण्यात आला. यामुळं जल शुद्धीकरण केंद्रला २४ तास वीज पुरवठा होणार आहे आणि बीड शहराला अखंडित पाणी पुरवठा होण्याची अपेक्षा आहे. बीड शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजना प्रस्तावित असून, त्यासाठी माजलगाव धरणातून पाणी आणण्याचा विचार देखील केला जात आहे.

**<u>क्षयरोग</u>**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत सोलापूर जिल्ह्यात सन २०२३ मध्ये ५३ तर गेल्यावर्षी १९९ ग्रामपंचायतींनी 'टीबी मुक्त' दर्जा प्राप्त केला आहे. जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग आणि समाजातील विविध घटकांच्या एकत्रित प्रयत्नांचं हे फलित आहे, अशी माहिती जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉक्टर मीनाक्षी बनसोडे यांनी दिली. सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी काल स्वतः नि-क्षय मित्र बनून सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिलं. जिल्ह्यातील नागरिकांनी या अभियानात सहभागी होण्याचं त्यांनी आवाहन केले. यावेळी टीबी मुक्त भारत अभियानाचे राज्य सल्लागार संजीव कुमार मिश्रा प्रामुख्यानं उपस्थित होते.

**<u>गणेशमूर्ती</u>**

मुंबईत गणेशमूर्तींचं विसर्जन झाल्यानंतर मूर्तींचे अवशेष चौपाट्यांवर दिसून आले. त्यामुळं पीओपी मूर्तींवर बंदीबाबत कठोर नियमावली तयार करा तसंच गणेशमूर्तींची उंची १० फुटांपर्यंत मर्यादित करा, अशी मागणी मूर्तिकार वसंत राजे यांनी केली आहे.

**<u>बांबूपरिषद</u>**

आंतरराष्ट्रीय बांबू दिनानिमित्त मुंबईत १८ आणि १९ सप्टेंबरला बांबू परिषद आयोजित करण्यात आली आहे. वातावरण बदलाचं संकट रोखून मानवजात वाचवण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय बांबू दिनाचं औचित्य साधून फिनिक्स फाऊंडेशन आणि 'महाराष्ट्र परिवर्तन संस्था' यांच्यामार्फत या परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. लोकांसाठी बांबू" अशी या परिषदेची संकल्पना आहे.

**<u>जनसुरक्षा</u>**

महायुती सरकारनं पारित केलेल्या जनसुरक्षा कायद्याविरोधात महाविकास आघाडीतर्फे काल  मोर्चा काढण्यात आला. नागपुर, रत्नागिरी, नाशिक, परभणी आणि सोलापूर इथंही अशा स्वरूपाचं आंदोलन करण्यात आलं.

आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत काल भारतानं संयुक्त अरब अमिरातीचा नऊ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना संयुक्त अरब अमिराती संघ केवळ 58 धावा करु शकला. भारतानं हे लक्ष्य पाचव्या  षटकातच पूर्ण केलं. कुलदीप यादवनं चार बळी घेतले. भारताविरुद्ध टी२० मध्ये कोणत्याही संघाची ही सर्वात कमी धावसंख्या आहे.

**<u>पाऊस</u>**

भंडारा जिल्ह्यात तीन दिवसाच्या विश्रांतीनंतर काल पावसानं दमदार हजेरी लावली. या पावसामुळं धान शेतीला फायदा होणार आहे.

**<u>हवामान-</u>**

मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात वीजा आणि जोराचे वारे यांच्यासह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**